# ११. प्राणी आणि आपण

**ललितगौरी डांगे** (१९५७) **:** प्रसिद्ध लेखिका. त्यांचे विविध विषयांवरील लेखन प्रसिद्ध आहे. विविध वृत्तपत्रे, नियतकालिके व मासिके यांतून त्यांनी लेखन केले आहे.

जंगल, प्राणी, पक्षी आणि मानव यांचे परस्परांशी एक अतूट नाते आहे. पर्यावरणाच्या साखळीचा ते महत्त्वाचा भाग आहेत. प्रस्तुत पाठातील मुलगा व वडील यांच्या संवादातून प्राणी वाचवा, जंगल वाचवा आणि पर्यावरण संरक्षण करा असा मोलाचा संदेश मिळतो. प्रस्तुत पाठ हा 'निर्मळ रानवारा' या मासिकातून घेतला आहे.

('शेपटीवाल्या प्राण्यांची भरली होती सभा' हे गाणे रेडिओवर लागलेले असते. गाणे ऐकत असताना घरी मुलगा व वडील यांच्यात संवाद सुरू होतो.)

**रोहन :** लहानपणापासून मी हे गाणं ऐकतोय; पण एकदासुद्‌धा मला कुठेही अशी एकत्र प्राण्यांची सभा दिसलीच नाही हो बाबा.

**बाबा :** अरे, सगळे प्राणी एकत्र कुठले दिसायला आता! अधूनमधून कुठे कुठे दिसले तरी पुष्कळ झालं.

**रोहन :** असं का म्हणता हो बाबा?

**बाबा :** अरे रोहन, दिवसेंदिवस प्राणी-पक्ष्यांची संख्या कमी कमी होत चालली आहे. आता पूर्वीसारखे मोर खूप दिसत नाहीत. अगदी कावळे, चिमण्यासुद्‌धा खूप प्रमाणात दिसत नाहीत, या उलट जंगलात राहणारा वाघ कधीतरी माणसांच्या वस्तीत येतोय.

**रोहन :** हो, हो खरंच. कसली घबराट झाली होती ना सगळ्यांची! पण बाबा, असं का होतंय हो?

**बाबा :** अरे, आपण माणसांनी त्यांच्या घरांवर कब्जा केलाय.

**रोहन :** म्हणजे काय?

**बाबा :** अरे, त्यांचे घर म्हणजे जंगल, अरण्य. आपण जंगलं नष्ट केली, झाडं तोडली, टेकड्या सपाट केल्या आणि आपली घरं बांधली, कारखाने उभारले, मग हे प्राणी राहणार कुठे? ते आले आपल्या वस्तीत!

**रोहन :** पण बाबा, झाडांपासून माणसाला खूप फायदे होतात.

**बाबा :** हो ना, म्हणून तर झाडंसुद्‌धा खूप प्रमाणात तोडली जातात, जशी चंदनाची झाडं किंवा इतर इमारती लाकूड, साग, देवदार आणि बरीच काही. त्यांचा उपयोग जाळण्यासाठी, फर्निचरसाठी, बांधकामासाठी होतो. जसजशी लोकसंख्या वाढते, माणसाच्या दैनंदिन गरजा वाढतात, चैनीच्या वस्तूंची आवड वाढते, तसतशी जंगलातली झाडं तोडली जातात. अशाप्रकारे जंगलं नष्ट झाली, की प्राणी, पक्षी यांचे राहायचे ठिकाण, त्यांचं खाद्य कमी होतं. एखाद्या प्रकारच्या प्राण्यांची किंवा पक्ष्यांची संख्या जरी कमी झाली, तरी त्याचा परिणाम संपूर्ण सृष्टीवर होतो, कारण त्यांची एक नैसर्गिक अन्नसाखळी असते आणि ती पूर्णपणे संतुलित असावी लागते.

**रोहन :** हो, बरोबर, वाघ हरणावर अवलंबून असतो, हरीण गवतावर अवलंबून असते, जर गवत कमी झालं, तर वाघांची संख्या कमी होईल, हो ना बाबा?

**बाबा :** अगदी बरोबर रोहन.

**रोहन :** आणि तसंच वनस्पतींवर किडे अवलंबून असतात. किड्यांवर बेडूक, बेडकावर साप आणि सापावर घार.

**बाबा :** हो आणि या अन्नसाखळीतला एक घटक जरी कमी झाला किंवा जास्त झाला, तरी संपूर्ण अन्नसाखळीचा तोल जातो व त्याचा परिणाम सृष्टीवर होतो.


**रोहन :** पण मग यावर काही उपाय नाही का?

**बाबा :** अरे, म्हणून तर जैवविविधतेच्या संरक्षणाचा करार 'वसुंधरा परिषदे'मध्ये करण्यात आला. ब्राझीलमध्ये १९९२ साली या परिषदेत अनेक देशातील प्रतिनिधींनी जैवविविधता संरक्षण करारावर सह्या केल्या. दुर्मीळ जातींच्या सजीवांच्या संरक्षणाचे उपाय केले.

**रोहन :** दुर्मीळ जातींचे सजीव म्हणजे काय?

**बाबा :** दुर्मीळ जातींचे सजीव म्हणजे ज्या वनस्पती किंवा प्राण्यांच्या प्रजातींचा ऱ्हास होत आहे, त्यांची संख्या कमी कमी होतं आहे. त्यांना दुर्मीळ सजीव असे म्हणतात. समजलं?

**रोहन :** दुर्मीळ सजीवांना संरक्षण कसं देणार?



**बाबा :** त्यासाठी तर काही कायदे करण्यात आले आहेत. राष्ट्रीय उद्याने, अभयारण्ये यांची निर्मिती करण्यात आली. संकटग्रस्त किंवा दुर्मीळ होत चाललेल्या प्रजातींच्या संवर्धनासाठी खास प्रकल्प तयार केले. बियाणे पेढ्या व गुणसूत्र पेढ्या अशा शास्त्रीय आधुनिक प्रयोगांद्वारे जैवविविधतेची जपणूक करण्यात येते.

**रोहन :** हे छान झालं. मग अभयारण्ये म्हणजे नक्की काय?

**बाबा :** हे बघ, जैवविविधता टिकवण्यासाठी काही भाग हा राखीव जैवविभाग म्हणून घोषित करण्यात आला आहे, तर काही अभयारण्ये म्हणून.

**रोहन :** आणि राष्ट्रीय उद्यानात काय करतात?

**बाबा :** राष्ट्रीय उद्यानातसुद्‌धा दुर्मीळ जातींच्या सजीवांचे संरक्षण करण्यासाठी उपाय केले जातात. याशिवाय वनस्पतीशास्त्रीय बागा व प्राणिसंग्रहालये यांतसुद्‌धा अभयारण्यांसारखेच सजीवांना संरक्षण दिले जाते.

**रोहन :** हो, बाबा, आपण सर्वांनी जर नियमांचे आणि कायद्याचे पालन केले तर प्राणी, पक्षी, झाडं यांचं संरक्षण होईल, कारण निसर्गातली इतकी विविधता पाहिली, की किती छान, प्रसन्न वाटतं ना? झाडांमुळे औषध, मसाल्याचे पदार्थ, मेण, लाख, राळ, मध या वस्तू तर भरपूर मिळतीलच; पण प्राण्यांचे नैसर्गिक घर म्हणजे जंगलंसुद्‌धा टिकतील आणि मग एक दिवस खरोखरच गाण्यात म्हटल्याप्रमाणे प्राण्यांची सभा भरेल.

**बाबा :** आणि त्यांचं संरक्षण केल्याबद्‌दल ते आपल्याला धन्यवाद देतील. हो ना?

**रोहन :** हो हो. नक्कीच.

**शब्दार्थ :** **कब्जा करणे** – ताबा मिळवणे. **दुर्मीळ** – मिळण्यास कठीण. **ऱ्हास** – नाश. **अभयारण्य** – प्राणी, पक्षी जिथे निर्भयपणे वावरू शकतात असे ठिकाण. **संवर्धन** – वाढ, विकास.

## स्वाध्याय


**प्र. १. कारणे लिहा.**

(अ) प्राणी-पक्ष्यांची संख्या कमी होत चालली आहे, कारण......

(आ) अभयारण्ये महत्वाची आहेत, कारण......

(इ) राष्ट्रीय उद्यानांची गरज आहे, कारण......

**प्र. २. खालील अन्नसाखळी पूर्ण करा.**




**प्र. ३. प्रश्न तयार करा.**

(अ) 'अभयारण्ये' हे उत्तर येईल, असा प्रश्न तयार करा.

(आ) 'दुर्मीळ सजीव' हे उत्तर येईल, असा प्रश्न तयार करा.

**प्र. ४. थोडक्यात उत्तरे लिहा.**

(अ) जंगलतोडीची कारणे लिहा.

(आ) ब्राझील येथे भरलेल्या वसुंधरा परिषदेची माहिती लिहा.

(इ) जैवविविधतेची जपणूक करण्यासाठी होत असलेले आधुनिक प्रयोग लिहा.

(ई) प्रस्तुत पाठात व्यक्त झालेली कल्पना प्रत्यक्षात येईल, असे तुम्हांस वाटते का? सकारण लिहा.

## खेळूया शब्दांशी.

**(अ) खालील शब्दांसाठी पाठात आलेले विरुद्धार्थी शब्द शोधून लिहा.**


(अ) जास्त × ______ (आ) अपूर्ण × ______

(इ) अनैसर्गिक × ______ (ई) चूक × ______

**(आ) अनेकवचन लिहा.**

(१) घर- (२) जंगल- (३) झाड- (४) औषध-

## लिहिते होऊया.




QD2R6M